स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव्यविद्या शाखेतील ‘समाजशास्त्र’ विषयात पीएच.डी. (Ph.D.) पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या संशोधन प्रकल्पाची रूपरेषा

संशोधन प्रकल्पाची रूपरेषा

(A Short Resume of the Research Topic)

‘‘ग्रामीण विकास आणि परिवर्तनात सहकारी साखर कारखान्यांची भूमिका एक समाजशास्त्रीय अध्ययन: विशेष संदर्भ सांगली जिल्हा.’’

संशोधक

प्रा. ढोबळे गोविंद नागनाथराव

समाजशास्त्र विभाग

क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय, वाळवा.

जि. सांगली.

मार्गदर्शक

डॉ. ए. टी. शिंदे

प्रमुख, समाजशास्त्र विभाग

इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको, नांदेड.

जून २०१९

‘‘ग्रामीण विकास आणि परिवर्तनात सहकारी साखर कारखान्याची भूमिका एक समाजशास्त्रीय अध्ययन : विशेष संदर्भ सांगली जिल्हा.’’

प्रस्तावना :—

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. जवळपास ७०% लोकांची उपजिविका शेती व शेती पुरक व्यवसायावर अवलंबून आहे. प्राचीन काळापासून भारतातील लोकांचा मुख्य व्यवसाय हा शेतीच असल्याचे दिसून येते. मात्र परकीयांच्या आगमनानंतर शेतीशी संबंधित अनेक छोटे-मोठे उद्योग निर्माण होण्यास सुरुवात झाली. विशेषत: ब्रिटीशांच्या आगमनानंतर भारतातील कृषी क्षेत्राात अधिक प्रमाणात बदल झााला. १८ व्या शतकाच्या सुरुवातीला औद्योगिक क्रांती झाली. त्याचा परिणाम भारतीय शेती व्यवसायावरही झाला. शेतीतून पिकवलेल्या अन्न-धान्यावरती प्रक्रिया करुन नवीन वस्तु बाजारपेठेत विक्री करण्यासाठी अनेक कारखाने उदयास आले.

ब्रिटीशांच्या काळात भारतीय लोकांना आधुनिक पध्दतीच्या शेतीचे ज्ञान होण्यास सुरुवात झाली. काही विशिष्ट भागातील आधुनिक पध्दतीचे शिक्षण घेतलेल्या शेतकऱ्यांनी पारंपरिक शेती ऐवजी आधुनिक पध्दतीच्या शेती व्यवसायाकडे वळले व नवीन पध्दतीची पीके घेण्यास सुरुवात केली. त्यामध्ये ऊसाची लागवड देखील याच काळात करण्यास शेतकऱ्यांनी सुरुवात केली. सुरुवातीला ऊसापासून गुळाची निर्मिती करण्यात येवू लागली. पुढे काही वर्षानंतर मोठ्या प्रमाणात ऊसाचे उत्पादन वाढले आणि बाजारपेठेत मागणी कमी झाली त्यामुळे गुळाला योग्य दर मिळत नव्हता म्हणून ऊसापासून साखर तयार करण्यासाठी भारतात इ.स. १९२० मध्ये पहिला साखर कारखाना अहमदनगर जिल्हयातील हरेगांव या ठिकाणी काढण्यात आला. पुढे इ.स. १९२६ मध्ये टिळकनगर या ठिकाणी दुसरा साखर कारखाना सुरु करण्यात आला. त्यामुळे शेतकऱ्यांनी गुळाऐवजी साखर कारखान्यास ऊस देण्यास प्राधान्य दिले त्यातून त्यांना चांगला आर्थिक फायदा होवू लागला.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशात कृषी विकास करण्याचे धोरण ठरवून प्रत्यक्षात अमंलबजावणीला सुरुवात झाली. शेती व शेतीशी संबंधित पुरक व्यवसाय मोठ्या प्रमाणात निर्माण करण्यात येवु लागले. त्याचा परिणाम देशात ऊसाचे उत्पादन अधिक प्रमाणात वाढत गेले. त्यातूनच साखर कारखान्याचा उदय झाला. भारतात डॉ. विठ्ठलराव विखे पाटील

यानी अहमदनगर जिल्हयातील प्रवरानगर या ठिकाणी पहिला सहकारी साखर कारखाना सुरु केला. त्यानंतर देशात हळूहळू सहकारी तत्वावर साखर कारखान्यांची निर्मिती होवू लागली.

आज देशात मोठ्या प्रमाणावर ऊसशेती केली जात आहे. यावर आधारीत भारताच्या कृषी औद्योगिक क्षेत्रात साखर उद्योग हा महत्त्वाचा व मोठा उद्योग म्हणून उदयास आला आहे. स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर राज्यात सहकारी साखर कारखान्यांची संख्या वाढत गेली म्हणूनच सहकारी साखर कारखान्यांनी ग्रामीण विकास आणि परिवर्तनाचे साधन म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली आहे. साखर कारखान्यांनी साखर उत्पादनाबरोबर जोड उत्पादन निर्माण करणारी कारखानदारी काढली. त्याचा शेती क्षेत्रावर अनुकूल परिणाम होवून ग्रामीण भागात पायाभूत सुविधाही वाढत आहेत. त्यामुळे साखर उद्योगाला महत्त्व प्राप्त झालेले आहे.

भारतात आज ३५२ सहकारी साखर कारखाने व १३४ खाजगी साखर कारखाने आहेत. महाराष्ट्र, गुजरात, उत्तरप्रदेश, कर्नाटक, आंध्रप्रदेश व तामिळनाडू या राज्यात ऊसाचे उत्पादन अधिक प्रमाणात केले जाते. विशेषत: महाराष्ट्रात सर्वाधिक साखर कारखाने आहेत. म्हणूनच देशात महाराष्ट्राचा ऊस उत्पादनात प्रथम क्रमांक लागतो. महाराष्ट्रात साखर उद्योग हा कृषी आधारित असा मुख्य उद्योग मानला जातो. राज्यात एकुण २०२ नोंदणीकृत सहकारी साखर कारखाने आहेत. साखर कारखान्याच्या आसपासच्या परिसरातील मुलभूत सोयी, सुविधांचा विकास वेगाने झाला आहे. साखर कारखान्याला जोडूनच शिक्षण संकुल उभारण्याची परंपरा महाराष्ट्रात निर्माण झाली आहे. कारखान्यामार्फत विविध पाटबंधारे योजना, उपसा सिंचन योजना सारख्या विकासाच्या योजना ग्रामीण भागात राबविल्या जात आहेत. तसेच शाळा, कॉलेज, दवाखाने यांसारख्या कल्याणकारी संस्था स्थापन केल्या गेल्या आहेत. त्यामुळे औद्योगिक विकासाबरोबरच शैक्षणिक व सामाजिक विकासही साधला गेला आहे. महाराष्ट्र हे कृषीप्रधान राज्य असल्यामुळे कृषी क्षेत्रातील सहकारी तत्वार उभी असलेली साखर कारखानदारी ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू ठरली आहे.

❖ संशोधन विषयाचे महत्व :

१) साखर उद्योगामुळे ग्रामीण भागातील विकास आणि परिवर्तनात झालेली संरचनात्मक कार्यात्मक स्थित्यंतरे अधोरेखीत करण्याच्या दृष्टीने या संशोधनाचे महत्व आहे.

२) महाराष्ट्रातील सामाजिक विकास आणि परिवर्तनाचा साखर उद्योग या कारकाच्या परिणामात्मक स्वरूपाचे अध्ययन करून विकास व परिवर्तनाच्या विषयांची दिशा रेखांकित करण्यासाठी हे अध्ययन सहाय्यक ठरणारे आहे.

३) विकास व परिवर्तनांच्या अध्ययनाच्या अनेक दृष्टीकोणापैकी 'साखर उद्योग' या दृष्टीकोनाच्या विकासाचे क्षेत्र वृध्दीगंत करण्यासाठी या संशोधनाचे महत्व आहे.

४) शेती, शेतकरी, ग्रामीण विकास, ग्रामीण परिवर्तन या घटकांच्या सकारात्मक–नकारात्मक, प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष बदलास कारणीभूत ठरणाऱ्या साखर उद्योगाचे संख्यात्मक व गुणात्मक योगदान निश्चित करण्यासाठी हे संशोधन लाभदायक ठरणारे आहे.

५) साखर उद्योगामुळे ग्रामीण जीवनात झालेल्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचे अध्ययन करून या परिवर्तनाच्या दिशा निश्चित करण्याच्या दृष्टीने हे संशोधन महत्वपूर्ण ठरणार आहे.

६) शेती व जोडधंदे, शेतकरी व सहकारी संस्था यांची विकास व परिवर्तनातील नेमकी भूमिका विशद करण्याच्या दृष्टीने हे संशोधन उपयुक्त ठरणारे आहे.

❖ संशोधन विषयाचे उद्देश :

संशोधन विषयाच्या निश्चितीनंतर त्या संशोधन विषयाचे काही उद्दिष्टये ठरविली जातात. म्हणून येथे सांगली जिल्ह्यातील ग्रामीण विकास आणि परिवर्तनात सहकारी साखर कारखान्याची भूमिका या अध्ययनासंबंधीचे उद्देश निश्चित केले आहेत.

१) साखर उद्योगामुळे झालेल्या सामाजिक विकासाचे अध्ययन करणे.

२) साखर उद्योगामुळे झालेल्या आर्थिक विकासाचे अध्ययन करणे.

३) साखर उद्योगामुळे झालेल्या शैक्षणिक परिवर्तानांचे अध्ययन करणे.

४) साखर उद्योगामुळे बदललेल्या राजकीय परिस्थितीचे अध्ययन करणे.

५) साखर उद्योगातून निर्मित शेतीपूरक व्यवसायाच्या विकासाचे अध्ययन करणे.

६) साखर उद्योगातून निर्मित झालेल्या सहकारी संस्थाच्या विकासाचे अध्ययन करणे.

७) साखर उद्योगामुळे झालेल्या सांस्कृतिक परिवर्तनाचा आढावा घेणे.

८) साखर उद्योगामुळे शेतीवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

❖ **संशोधनाची गृहीत कृत्ये :**

सामाजिक संशोधनात गृहित कृत्यांना अधिक महत्त्व आहे. एकदा समस्या निर्धारण्याचे कार्य पुर्ण झाले की निर्धारित विषयाची संभाव्य उत्तरे विधानाच्या स्वरुपात मांडण्यासाठी संशोधकाने लक्ष देणे उपयुक्त ठरते ही संभाव्य उत्तरे म्हणजेच गृहीत कृत्ये होय. गृहीत कृत्याशिवाय संशोधनाला योग्य दिशा मिळत नाही. म्हणुन प्रस्तुत संशोधन विषयासंबंधीचे गृहीतके पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) साखर उद्योगामुळे सामाजिक विकासाला गती मिळाली आहे.

२) साखर उद्योगामुळे आर्थिक विकासाला चालना मिळते.

३) साखर उद्योग शैक्षणीक विकासाला सहाय्यक ठरतो.

४) साखर उद्योगामुळे राजकीय भूमिकेत परिवर्तन झालेले आहे.

५) साखर उद्योगामुळे शेतीपुरक व्यवसायाचा विकास झालेला आहे.

६) साखर उद्योगामुळे सहकारी संस्थांच्या संख्येत व क्षेत्रात वृध्दी होत आहे.

७) साखर उद्योगामुळे सांस्कृतिक परिर्वतन होत आहे.

८) साखर उद्योगामुळे शेती व्यवसायावर दुष्परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे.

❖ **संशोधन अध्ययन क्षेत्र :**

संशोधनाचा विषय ठरविल्यानंतर हे अध्ययन कोणत्या भौगोलिक क्षेत्राचे करावयाचे आहे हे ठरविणे आवश्यक आहे. म्हणून पश्चिम महाराष्ट्रातील सांगली जिल्हयाची निवड संशोधनाचे क्षेत्र म्हणुन केली आहे. महाराष्ट्रात इ.स. १९६० नंतर सहकारी साखर कारखानदारीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यामध्ये पश्चिम महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक लागतो. सांगली जिल्हयामध्ये एकूण १६ सहकारी साखर काखान्यांनी ग्रामीण समाजात विकास व परिवर्तन घडविण्यासाठी आपले योगदान दिलेले आहे.

❖ **प्रस्तुत संशोधनाच्या मर्यादा :**

प्रस्तूत संशोधनाचे अध्ययन क्षेत्र सांगली जिल्हा निवडण्यात आला आहे त्यामुळे या संशोधनातील निष्कर्ष हे सांगली जिल्हयापुरतेच मर्यादित राहतील. साखर उद्योग हा शेतीशी संबंधीत असल्यामुळे ग्रामीण परिसरातच साखर उद्योग निर्माण झाले आहेत त्यामुळे ग्रामीण समाजातच परिवर्तन अधिक झालेले आहे. तसेच हे संशोधन

कारखाना कार्यक्षेत्रातील एकूण ४८ गावे निवडण्यात आलेली असल्यामुळे येणारे निष्कर्ष हे संपूर्ण ग्रामीण समाजासाठी लागू असणार नाहीत.

❖ संशोधन आराखडा :

संशोधनामध्ये संशोधकाला निश्चित दिशा प्राप्त होण्यासाठी संशोधन आराखडा अत्यंत उपयुक्त आहे. संशोधनातील वेळ, श्रम, पैसा याचा अपव्यय टाळण्यासाठी आणि भविष्यकाळात निर्माण होणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी आराखडा आवश्यक आहे. संशोधन आराखडा ही एक अशी योजना आहे की जी समस्येच्या निर्धारणापासून तर संशोधन अहवालाच्या शेवटच्या अवस्थेपर्यंत महत्त्वाचे असते. म्हणूनच प्रस्तुत संशोधन विषयासाठी परिचयात्मक व वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरण्यात येणार आहे.

❖ नमुना निवड :

‘‘ग्रामीण विकास आणि परिवर्तनात सहकारी साखर कारखान्यांची भूमिका एक समाजशास्त्रीय अध्ययन: विशेष संदर्भ सांगली जिल्हा’’ या संशोधन विषयाच्या संदर्भात आवश्यक तथ्य संकलन करण्यासाठी लॉटरी नमुना निवड पध्दतीचा अवलंब केला जाईल. सांगली जिल्हयामध्ये एकूण १६ सहकारी साखर कारखाने आहेत त्या कारखाना कार्यक्षेत्रात ५४२ गावे आहेत त्यामुळे प्रत्येक गावात जाऊन माहिती संकलीत करणे अशक्य आहे म्हणून प्रस्तूत संशोधन अध्ययनासाठी लॉटरी नमूना निवड पध्दतीचा अवलंब करून प्रत्येक कारखाना कार्यक्षेत्रातील ३ गावांची म्हणजेच ४८ गावे निवडण्यात येतील व निवडण्यात आलेल्या प्रत्येक गावातील ५ कुटुंबाची निवड केली जाईल म्हणजेच अध्ययनासाठी एकूण २४० कुटुंबाची निवड करण्यात येईल.

❖ तथ्य संकलन तंत्र व पध्दती :

सामाजिक संशोधन करताना तथ्य संकलन तंत्राचा वापर करावा लागतो. प्राथमिक तथ्य संकलन व दुय्यम तथ्य संकलन अशा तथ्य संकलनाच्या प्रमुख दोन पध्दती आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी विविध तथ्य संकलन तंत्राचा अवलंब करून प्राथामिक व व्दितीय तथ्य संकलीत करण्याचा प्रयत्न केला जाईल. प्राथमिक तथ्य संकलनासाठी सांगली जिल्हयातील साखर कारखाना कार्यक्षेत्रातील ४८ गावतून प्रत्येकी ५ असे कुटुंब निवडण्यात येतील. निवडण्यात आलेल्या २४० नमुना

घटकाकडून माहिती गोळा करण्यासाठी प्रामुख्याने 'मुलाखत अनुसूची' तंत्राचा वापर केला जाईल. तसेच द्वितीय तथ्य संकलनासाठी संबंधित जिल्हयातील शासकीय अहवाल, आकडेवारी या शिवाय साखर उद्योगाशी संबंधीत लिखीत साहित्य संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, साप्ताहिक, मासिके, पुस्तके व इंटरनेट इत्यादींचा आधार घेवून माहिती संकलित करण्यात येईल.

❖ **तथ्याचे वर्गीकरण व विश्लेषण :**

सामाजिक संशोधनात तथ्याचे संकलन केल्यानंतर त्याचे विश्लेषण करणे आवश्यक असते. प्रस्तुत संशोधनासाठी संकलित करण्यात आलेल्या तथ्यांचे वर्गीकरण व विश्लेषण करण्यात येईल. त्यासाठी तथ्यांचे वर्गीकरण, संकेतीकरण व सारणीकरण करुन तथ्य विश्लेषणत सुसूत्रता आणण्याचा व अचूक निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केला जाईल.

❖ **अहवाल लेखन :**

संशोधन अहवाल ही सामाजिक संशोधनातील शेवटची पायारी आहे. संशोधन अध्ययनातील संपादीत तथ्य सामग्रीच्या पुराव्याद्वारे संशोधन कर्ता जे स्पष्टीकरण करतो त्या आधारे संशाधनाचा अहवाल तयार केला जातो. संशोधन अहवालात प्रस्तावना, अध्ययन क्षेत्र गृहितकृत्ये, तथ्यसंकलन, तथ्यांचे विश्लेषण, निष्कर्ष व शिफारशी आणि शेवटी संदर्भग्रंथ सुची तयार करण्यात येईल.

प्रकरण रचना

''ग्रामीण विकास आणि परिवर्तनात सहकारी साखर कारखान्याची भूमिका एक समाजशास्त्रीय अध्ययन:विशेष संदर्भ सांगली जिल्हा''या संशोधन विषयाच्या अभ्यासाच्या सोयीसाठी प्रकरणाची मांडणी पुढील प्रमाणे करण्यात येईल.

१) प्रस्तावना :

प्रस्तुत संशोधनाच्या पहिल्या प्रकरणात भारतीय समाजाची ओळख व प्रकार, ग्रामीण समाजाचा अर्थ, सामाजिक परिवर्तनाचा अर्थ व सामाजिक परिवर्तनाचे घटक, ग्रामीण समाजातील परिवर्तन, औद्योगिक क्रांती, भारतातील उद्योगधंद्यांचा विकास, साखर कारखान्यांचा उदय, सहकार चळवळीचा उदय, सहकार उद्योगांचा विकास, सहकारी साखर

कारखान्यांचा उदय, सांगली जिल्हयातील साखर उद्योगांचा विकास आणि प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भीय उपयुक्त साहित्याचा आढावा घेतला जाईल.

२) संशोधन पध्दती :

संबंधीत प्रकरणामध्ये संशोधन क्षेत्राची निवड, संशोधनाचे उद्‌देश, गृहितकृत्ये, संशोधन आराखडा नमुना निवड, तथ्य संकलन पध्दती, तथ्याचे विश्लेषण व तथ्य संकलनातील अनुभव या प्रकरणात मांडण्यात येईल.

३) वैयक्तिक व कौटुंबिक माहिती :

प्रस्तूत संशोधनाच्या तिस-या प्रकरणात कुटुंबाचा आकार, स्त्रि—पुरूष प्रमाण, शिक्षणाचे प्रमाण, शेतीचे स्वरूप, व आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर इत्यादींचा अभ्यास करण्यात येईल.

५) सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक परिवर्तन :

या प्रकरणामध्ये पारंपारीक शेती, आधुनिक शेती, व्यावसायिक प्रशिक्षण, उत्पादनाच्या साधनातील बदल, रोजगाराची संधी, उत्पादित पिकांना योग्य मोबदला तसेच शैक्षणिक जाणीव, आधुनिक शिक्षण, स्त्रि—पुरूष शिक्षणाचे प्रमाण यामध्ये झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास करण्यात येईल.

६) राजकीय व सांस्कृतिक परिवर्तन :

ग्रामीण भागातील लोकांच्या राहणीमानात झालेले परिवर्तन, दळणवळणाच्या साधनातील बदल, भौतिक सुख सुविधा व राजकीय परिवर्तनाचा अभ्यास करण्यात येईल.

६) निष्कर्ष आणि शिफारशी :

सदर संशोधनाच्या सहाव्या प्रकरणात सांगली जिल्हयातील सहकारी साखर उद्योगामुळे ग्रामीण समाजात झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास करण्यासाठी प्राप्त झालेल्या तथ्यांच्या आधारे वस्तुनिष्ठ स्वरूपाचे निष्कर्ष मांडून त्या बाबतीत काही सुचना करण्यात येतील.

अशा प्रकारे प्रस्तुत संशोधनासाठीची प्रकरण योजना असून या प्रकरण योजनेमध्ये एकंदरीत संशोधनाच्या रूपरेषेमध्ये संशोधन पध्दतीच्या गरजेनुसार आवश्यक ते बदल केले जातील.

संदर्भ ग्रंथ सूची

१) आगलावे प्रदिप,(२०००), *सामाजिक संशोधनातील तंत्र व पध्दती,* श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२) बोधनकार सुधिर, अलोणी विवेक (२००१), *सामाजिक संशोधन पध्दती,* श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

३) काचोळे दा. धो.,(१९९१), *औद्योगिक समाजशास्त्र,* कैलास प्रकाशन, औरंगाबाद.

४) बोबडे प्रकाश, (२००१), *भारतीय समाजरचना - पारंपारिक व आधुनिक,* श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

५) घाटोळे रा. ना.,(२०००), *ग्रामीण समाजशास्त्र व सामुदायिक विकास,* श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

६) घाटोळे रा. ना.,(२०००), *समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पध्दती,* श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

७) कुलकर्णी आनंद, (जुलै २००२)‘*महाराष्ट्रातील साखर उद्योग*’ शेतकरी ऊस विशेषांक

८) सोंडगे एम. एन.- *भारतीय साखर उद्योगात महाराष्ट्राचे स्थान, गोडवा.*

९) दैनिक केसरी - *साखर उद्योग विकास विशेष पुरवणी* -१ एप्रिल २००३

संशोधक

प्रा. ढोबळे गोविंद नागनाथराव
समाजशास्त्र विभाग
क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय,
वाळवा. जि. सांगली.

मार्गदर्शक

डॉ. ए. टी. शिंदे
समाजशास्त्र विभाग प्रमुख
इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय,
सिडको, नांदेड.